महाराष्ट्र शासन

क्र.:- अधापु २०१५/प्र.क्र.७६/नापु २२
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई
दिनांक:- १ एप्रिल, २०१६

प्रति,

१) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
२) सर्व उपायुक्त (पुरवठा),
३) सर्व जिल्हाधिकारी,
४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/ सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,

**विषय :- राज्यातील कल्याणकारी संस्था व वसतीगृह यांना माहे माहे ऑक्टोबर, २०१५ ते मार्च, २०१६ या कालावधीकरिता अन्नधान्याचे मासिक व सहामाही नियतन मंजूर करण्याबाबत.**

**संदर्भ :-१) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक ४-६/२०१५-BP-II, दिनांक २३ मार्च, २०१६**
**२) शासन निर्णय क्रमांक साविव्य-१००२/११३७/प्र.क्र. ९७३/ ना.पु. २८, दि. २६.४.२००२**

राज्यातील कल्याणकारी संस्था व वसतीगृहे यांना माहे ऑक्टोबर, २०१५ ते मार्च, २०१६ या कालावधीकरीता बी.पी. एल. दराने अन्नधान्याचे मासिक नियतन वितरीत करण्यासाठी मागील कालावधीची शिल्लक विचारात घेऊन केंद्र शासनाने त्यांच्या दि. २३.३.२०१६ च्या संदर्भाधीन पत्रान्वये महाराष्ट्र राज्यासाठी १७४६.४२ मे. टन गहू व ८७३.६८ मे. टन तांदूळ याप्रमाणे एकूण २६२०.१० मे. टन अन्नधान्याचे नियतन मंजुर केले आहे. त्यानुसार जिल्हानिहाय नियतन देताना देखील प्रत्येक जिल्ह्यांनी कल्याणकारी संस्था व वसतीगृहे यांकरिता त्यांना पुर्वी दिलेल्या नियतनामधून पात्र लाभार्थ्यांना वाटप झाल्यानंतर माहे सप्टेंबर, २०१५ अखेर त्या जिल्ह्यांकडे शिल्लक असलेल्या शासनास कळविलेल्या आकडेवारीनुसार माहे ऑक्टोबर, २०१५ ते मार्च, २०१६ या कालावधीसाठी (६ महिन्यांसाठी एकत्रीत नियतन) अन्नधान्याचे नियतन तयार करण्यात आले असून ते सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आले आहे. संबंधीतांनी सदर नियतनाची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या नजिकच्या गोदामातून बी.पी.एल. दराने अन्नधान्याचे पैसे भरुन करावी.

केंद्र शासनाने त्यांच्या दि. २३.३.२०१६ च्या पत्रान्वये राज्याकडे शिल्लक असलेले अन्नधान्य विचारात घेऊन माहे ऑक्टोबर, २०१५ ते मार्च, २०१६ या कालावधीकरिता अन्नधान्याचे नियतन दिले आहे. त्यामुळे जिल्हानिहाय नितयन देताना ज्या जिल्ह्यांकडे मागील अन्नधान्य शिल्लक नाही, अशा जिल्ह्यांना पूर्ण प्रमाणात नियतन दिले आहे. तसेच ज्या जिल्ह्यांकडे पुरेशी शिल्लक नाही, त्या जिल्ह्यांना देखील केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या नियतनामधून काही प्रमाणात अन्नधान्याचे नियतन देण्यात आले आहे. सदर जिल्ह्यांनी प्रथम आवश्यकतेनुसार त्यांच्याकडील मागील शिल्लकीतून अन्नधान्याचे वाटप करावे व ते अन्नधान्य पुरेसे नसल्यास भारतीय अन्न महामंडळाकडून अन्नधान्याची उचल करावी. ज्या जिल्ह्यांकडे मागील कालावधीतील पुरेसे अन्नधान्य शिल्लक आहे, त्या जिल्ह्यांना अन्नधान्याचे नियतन देण्यात येत नसून त्या जिल्ह्यांनी त्यांना देय असलेल्या नियतनाच्या प्रमाणात मागील शिल्लक अन्नधान्यातून अन्नधान्याचे वाटप करावे. सोबतच्या विवरणपत्रामध्ये पात्र लाभार्थ्यांनुसार मासिक तसेच ६ महिन्यांचे आवश्यक नियतन स्तंभ क्र. ११ ते १६ मध्ये दर्शविण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्याकडे असलेली मागील शिल्लक विचारात घेऊन भारतीय अन्न महामंडळाकडून उचलावयाच्या नियतनाची आकडेवारी स्तंभ क्र. १७ ते १९ मध्ये दर्शविण्यात आली आहे. भारतीय अन्न महामंडळाकडून अन्नधान्याची उचल करताना ६ महिन्यांची उचल दि. १५.४.२०१६ पर्यंत एकत्रीतपणे करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे स्तंभ क्र. १७ ते १९ मध्ये दर्शविलेल्या आकडेवारीनुसारच अन्नधान्याची एकत्रीत उचल तत्काळ करावी.

यानुसार कल्याणकारी संस्था व वसतीगृहे इत्यादींना द्यावयाचे मासिक व ऑक्टोबर, २०१५ ते मार्च, २०१६ या ६ महिन्यांच्या कालावधीसाठी नियतन दर्शविणारे विवरणपत्र सोबत जोडले आहे.

केंद्र शासनाने त्यांच्या उपरोक्त दि. २३.३.२०१६ च्या पत्रान्वये माहे ऑक्टोबर, २०१५ ते मार्च, २०१६ या कालावधीच्या अन्नधान्याची रक्कम भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्यासाठी व अन्नधान्याची उचल करण्यासाठी दि. १५.४.२०१६ पर्यंत अतिम मुदत दिली आहे. सबब भारतीय महामंडळाच्या नजिकच्या क्षेत्रिय कार्यालयाशी संपर्क साधून विहित मुदतीतच अन्नधान्याची रक्कम भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करुन ६ महिन्यांसाठी सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र. १४, १५ व १६ नुसार नियतन दिलेल्या नियतनापैकी **स्तंभ क्र. १७, १८ व १९ मध्ये दर्शविलेल्या अन्नधान्याची भारतीय अन्न महामंडळाकडून उचल पूर्ण होईल** याची दक्षता घ्यावी.

कल्याणकारी संस्था व वसतीगृहे यांना अन्नधान्य वितरीत करावयाच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर आदेश संदर्भाधीन दि. २६.४.२००२ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार अन्नधान्य वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

क्षेत्रिय कार्यालयांकडून यापूर्वी शासनास कळविण्यात आलेल्या कल्याणकारी संस्थांच्या व त्यावरील लाभार्थ्यांच्या आकडेवारीनुसार उपरोक्त नियतन देण्यात येत आहे. केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये सूचित केल्यानुसार अन्नधान्याची उचल पूर्ण करण्यात यावी व माहे मार्च, २०१६ अखेर शिल्लक असलेल्या अन्नधान्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास विनाविलंब दि. ३०.४.२०१६ पर्यत सादर करावे.

सोबत :- विवरणपत्र

(हेमंत वाडीकर)
कक्ष अधिकारी

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१) महाव्यवस्थापक, व भारतीय अन्न महामंडळ, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे मंजूर केलेले नियतन मुक्त (release) करण्याच्या सुचना सर्व जिल्हा प्रबंधक भारतीय अन्न महामंडळ यांना तात्काळ द्याव्यात

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव , मुंबई, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

३) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई. यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील महाफुड आज्ञावलीव्दारे प्राप्त करुन घ्यावा.

४) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा तसेच सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर आदेशान्वये केलेले नियतन विचारात घेऊन अन्नधान्याचे वाटप करावे.

(हेमंत वाडीकर)
कक्ष अधिकारी

प्रत,

१) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.
यांना विनंती करण्यात येते की, वरील प्रमाणे प्राप्त झालेली माहिती तपासून राज्याची एकत्रित माहिती शासनास सादर करावी.

२) कक्ष अधिकारी, ना.पु. २८, अन्न, नागरी पुरवठा.व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

३) अवर सचिव (संगणक कक्ष), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत नियतनाचे आदेश विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावेत.

४) निवड नस्ती - ना.पु.२२

## MONTHLY ALLOCATION TO WELFARE INSTITUTIONS SCHEME FOR THE PERIOD FROM OCTOBER, 2015 TO MARCH, 2016

| SR.No. | DISTRICTS | No. OF INSTIUTIONS | No. OF BENEFICIARIES | PREVIOUS BALANCE (UPTO 30TH SEPTEMBER 2015) (MT) | | | QUANTUM PER BENEFICIARY PER MONTH (KG) | | | MONTHLY REQUIRED ALLOCATION (MT) | | | REQUIRED ALLOCATION FOR 6 MONTHS ( OCTOBER, 2015 TO MARCH, 2016) (MT) | | | ACTUAL ALLOCATION FOR 6 MONTHS (OCTOBER 2015 TO MARCH 2016) (MT) AFTER DEDUCTING PREVIOUS BALANCE ( TO BE LIFTED FROM FCI ) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 1 | MUMBAI | 86 | 23195 | 0.000 | 0.000 | 0.000 | 10 | 5 | 15 | 186 | 46 | 232 | 1113 | 278 | 1392 | 1113 | 278 | 1392 |
| 2 | THANE | 22 | 3284 | 1665.486 | 1573.858 | 3239.344 | 5 | 10 | 15 | 16 | 33 | 49 | 99 | 197 | 296 | 0 | 0 | 0 |
| 3 | PALGHAR | 73 | 10524 | 0.000 | 0.000 | 0.000 | 5 | 10 | 15 | 37 | 53 | 89 | 221 | 316 | 537 | 221 | 316 | 537 |
| 4 | RAIGAD | 47 | 9699 | 0.000 | 0.000 | 0.000 | 5 | 10 | 15 | 34 | 48 | 82 | 204 | 291 | 495 | 204 | 291 | 495 |
| 5 | RATNAGIRI | 63 | 6390 | 223.390 | 159.290 | 382.680 | 5 | 10 | 15 | 32 | 29 | 61 | 192 | 173 | 364 | 0 | 13 | 13 |
| 6 | SINDHUDURG | 15 | 624 | 60.080 | 77.170 | 137.250 | 5 | 10 | 15 | 3 | 6 | 9 | 19 | 37 | 56 | 0 | 0 | 0 |
| 7 | NASIK | 88 | 24197 | 0.000 | 0.000 | 0.000 | 10 | 5 | 15 | 194 | 60 | 254 | 1161 | 363 | 1524 | 1161 | 363 | 1524 |
| 8 | DHULE | 116 | 16206 | 451.000 | 138.000 | 589.000 | 10 | 5 | 15 | 130 | 41 | 170 | 778 | 243 | 1021 | 327 | 105 | 432 |
| 9 | NANDURBAR | 96 | 14236 | 579.000 | 45.000 | 624.000 | 5 | 10 | 15 | 71 | 64 | 135 | 427 | 384 | 811 | 0 | 339 | 339 |
| 10 | JALGAON | 155 | 19624 | 863.168 | 176.249 | 1039.417 | 10 | 5 | 15 | 157 | 39 | 196 | 863 | 235 | 1098 | 0 | 59 | 59 |
| 11 | AHMEDNAGAR | 218 | 20547 | 322.753 | 116.961 | 439.714 | 10 | 5 | 15 | 164 | 41 | 205 | 986 | 247 | 1233 | 664 | 130 | 793 |
| 12 | PUNE DSO | 89 | 8126 | 653.800 | 84.400 | 738.200 | 10 | 5 | 15 | 81 | 20 | 102 | 488 | 122 | 609 | 0 | 37 | 37 |
| 13 | PUNE FDO | 25 | 8889 | 0.000 | 0.000 | 0.000 | 10 | 5 | 15 | 71 | 22 | 93 | 427 | 133 | 560 | 427 | 133 | 560 |
| 14 | SATARA | 103 | 8803 | 511.110 | 184.230 | 695.340 | 10 | 5 | 15 | 88 | 44 | 132 | 528 | 264 | 792 | 17 | 80 | 97 |
| 15 | SANGALI | 102 | 6835 | 39.460 | 0.000 | 39.460 | 10 | 5 | 15 | 55 | 17 | 72 | 328 | 103 | 431 | 289 | 103 | 391 |
| 16 | SOLAPUR DSO | 121 | 10873 | 545.227 | 66.844 | 612.071 | 10 | 5 | 15 | 98 | 27 | 125 | 587 | 163 | 750 | 42 | 96 | 138 |
| 17 | SOLAPUR FDO | 7 | 1658 | 27.220 | 7.110 | 34.330 | 10 | 5 | 15 | 13 | 4 | 17 | 80 | 25 | 104 | 52 | 18 | 70 |
| 18 | KOLHAPUR | 63 | 5316 | 536.707 | 109.925 | 646.632 | 10 | 5 | 15 | 43 | 27 | 69 | 255 | 159 | 415 | 0 | 50 | 50 |
| 19 | AURANGABAD | 97 | 9034 | 193.000 | 11.000 | 204.000 | 10 | 5 | 15 | 68 | 23 | 90 | 407 | 136 | 542 | 214 | 125 | 338 |
| 20 | JALNA | 70 | 9317 | 906.787 | 172.327 | 1079.114 | 10 | 5 | 15 | 93 | 23 | 116 | 559 | 140 | 699 | 0 | 0 | 0 |
| 21 | BEED | 233 | 20757 | 147.300 | 50.000 | 197.300 | 10 | 5 | 15 | 156 | 52 | 208 | 934 | 311 | 1245 | 787 | 261 | 1048 |
| 22 | NANDED | 271 | 32771 | 880.030 | 172.910 | 1052.940 | 10 | 5 | 15 | 246 | 82 | 328 | 1475 | 492 | 1966 | 595 | 319 | 913 |
| 23 | PARBHANI | 171 | 13025 | 32.000 | 0.000 | 32.000 | 10 | 5 | 15 | 98 | 33 | 130 | 586 | 195 | 782 | 554 | 195 | 750 |
| 24 | HINGOLI | 75 | 8143 | 549.000 | 101.000 | 650.000 | 10 | 5 | 15 | 81 | 16 | 98 | 489 | 98 | 586 | 0 | 0 | 0 |
| 25 | LATUR | 225 | 17182 | 1098.990 | 143.700 | 1242.690 | 10 | 5 | 15 | 172 | 34 | 206 | 1031 | 206 | 1237 | 0 | 62 | 62 |
| 26 | OSMANABAD | 114 | 9967 | 524.990 | 142.140 | 667.130 | 10 | 5 | 15 | 100 | 20 | 120 | 598 | 120 | 718 | 73 | 0 | 73 |
| 27 | AMRAVATI | 170 | 25000 | 0.000 | 0.000 | 0.000 | 10 | 5 | 15 | 188 | 75 | 263 | 1125 | 450 | 1575 | 1125 | 450 | 1575 |
| 28 | AKOLA | 178 | 8054 | 202.970 | 63.220 | 266.190 | 10 | 5 | 15 | 64 | 20 | 85 | 387 | 121 | 507 | 184 | 58 | 241 |
| 29 | WASHIM | 103 | 7924 | 3.800 | 142.200 | 146.000 | 10 | 5 | 15 | 63 | 20 | 83 | 380 | 119 | 499 | 377 | | 377 |
| 30 | BULDHANA | 255 | 15794 | 259.000 | 67.000 | 326.000 | 10 | 5 | 15 | 126 | 39 | 166 | 758 | 237 | 995 | 499 | 170 | 669 |
| 31 | YAVATMAL | 259 | 26287 | 260.000 | 52.000 | 312.000 | 10 | 5 | 15 | 197 | 66 | 263 | 1183 | 394 | 1577 | 923 | 342 | 1265 |
| 32 | NAGPUR DSO | 132 | 13009 | 386.120 | 299.130 | 685.250 | 10 | 5 | 15 | 98 | 65 | 163 | 585 | 390 | 976 | 199 | 91 | 290 |
| 33 | NAGPUR FDO | 71 | 9062 | 234.000 | 102.000 | 336.000 | 10 | 5 | 15 | 68 | 23 | 91 | 408 | 136 | 544 | 174 | 34 | 208 |
| 34 | WARDHA | 92 | 5311 | 4429.300 | 665.500 | 5094.800 | 10 | 5 | 15 | 53 | 27 | 80 | 319 | 159 | 478 | 0 | 0 | 0 |
| 35 | BHANDARA | 110 | 7861 | 0.000 | 33.100 | 33.100 | 5 | 10 | 15 | 28 | 35 | 63 | 165 | 212 | 377 | 165 | 179 | 344 |
| 36 | GONDIA | 118 | 11240 | 157.660 | 30.680 | 188.340 | 5 | 10 | 15 | 39 | 51 | 90 | 236 | 303 | 540 | 78 | 273 | 351 |
| 37 | CHANDRAPUR | 149 | 16678 | 1297.200 | 1104.300 | 2401.500 | 5 | 10 | 15 | 58 | 167 | 225 | 350 | 1001 | 1351 | 0 | 0 | 0 |
| 38 | GADCHIROLI | 160 | 28212 | 796.516 | 494.796 | 1291.312 | 5 | 10 | 15 | 99 | 127 | 226 | 592 | 762 | 1354 | 0 | 267 | 267 |
| TOTAL | | 4542 | 493654 | 18837.064 | 6586.040 | 25423.104 | | | | 3567 | 1619 | 5186 | 21401 | 9715 | 31037 | 10462 | 5237 | 15700 |